ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{ Bi-Monthly} Volume-II, Issue-II Augest 2013

# नाशिक जिल्ह्यातील आदिवासी विकास योजनांवरील वर्षनिहाय खर्चाचे विश्लेषण

**मार्गदर्शक**
**श्रीमती डॉ. विद्या सोहनी**
**बिटको कॉलेज, नाशिकरोड**

**श्री. कापडी ए. एस.**
**पीएच.डी. संशोधक विद्यार्थी**
**के.टी.एच.एम. कॉलेज, नाशिक**

**सारांश : -**

महाराष्ट्र शासनाच्या आदिवासी विकास विभागामार्फत आदिवासी विकासाच्या समाजासाठी विकासासाठी विविध कल्याणकारी योजनांची आखणी केली जाते. परंतु या योजनांची या समाजाला माहिती नसल्यामुळे हा समाज विकासापासून वंचित आहे. अनुसूचित जमातींच्या आर्थिक आणि सामाजिक कल्याणासाठी विविध प्रकारच्या विकास योजनांची अंमलबजावणी केली जात आहे. मात्र त्यांची माहिती आदिवासींना नसल्याने त्यांच्या आर्थिक व सामाजिक परिस्थितीत पाहिजे त्या प्रमाणात सुधारणा झालेली नाही.

प्रस्तुत लेखात संशोधकाने आदिवासी उपयोजने अंतर्गत नाशिक जिल्ह्यात सन २०००-०१ ते सन २००९-१० या १० वर्षाच्या संशोधन कालावधीत विविध विकास योजनांवर केलेल्या खर्चाचे अध्ययन केले आहे.

**मुख्य संज्ञा : - आदिवासी विकास योजनांवरील वर्षनिहाय खर्च**

**प्रस्तावना : -**

राज्य शासनाने श्री. द. म. सुकथनकर, राज्य नियोजन मंडळाचे सदस्य आणि माजी मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करुन समितीच्या अहवालातील शिफारशी स्विकारल्या आहेत. त्यानुसार सन १९९३-९४ पासुन सुधारीत आदिवासी उपयोजना लागू करण्यात आल्या आहेत. राज्याच्या एकूण लोकसंख्येच्या ९ टक्के आदिवासी लोकसंख्या आहे. त्यामुळे सदर लोकसंख्या विचारात घेऊन लोकसंख्येच्या प्रमाणात आदिवासी जनतेच्या विकासासाठी निधी उपलब्ध करुन देण्यात यावा अशा आशयाची शिफारस सुकथनगर समितीने केली. सदर शिफारशीनुसार टप्प्या टप्प्याने ९ टक्के पर्यंत नियतव्यय उपलब्ध करुन दयावयाचा होता. त्याप्रमाणे टप्प्या टप्प्याने प्रतिवर्ष नियतव्ययात वाढ होऊन सन २००५-०६ पासुन सरासरी ९ टक्के नियतव्यय उपलब्ध होत आहे.

## कोष्टक


## आदिवासी विकास योजनांवर झालेल्या वर्षनिहाय खर्चाचे वर्गीकरण

| अ. क्र. | आर्थिक वर्ष / शीर्षक | २०००-२००१ | २००१-२००२ | २००२-२००३ | २००३-२००४ | २००४-२००५ | २००५-२००६ | २००६-२००७ | २००७-२००८ | २००८-२००९ | २००९-२०१० | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | कृषी व संलग्न सेवा | ४७४.५८ (९.४) | ५०५.४२ (८.९) | ३४१.८५ (६.६) | २९६.४३ (६.९) | १५३.८५ (२.७) | २५२.०८ (२.६) | ३३९.५ (५.०) | ५४३.१९ (४.५) | ९५४.४८ (४.२) | ९६४.८० (५.७) | ४५२९.१८ (५.२) |
| २ | ग्रामीण विकास | ६१४.४६ (१२.१) | ८५०.७८ (१५.१) | ९०३.३१ (१७.३) | १०७१.७२ (२२.९) | १०५९.६० (१८.२) | १०९१.३६ (११.४) | १०१२.७१ (१५.०) | १३३४.४३ (११.२) | १२१२.०७ (७.८) | १४५४.९० (८.४) | १०६०५.२४ (१२.१) |
| ३ | विशेष क्षेत्रिय कार्यक्रम | त.ना. | १५३.४० (२.७) | १५३.४० (२.९) | त.ना. | त.ना. | त.ना. | त.ना. | त.ना. | त.ना. | त.ना. | ३०६.८ (०.०४) |
| ४ | पाटबंधारे व पूरनियंत्रण | ४८१.७० (९.५) | ३८२.०० (६.७) | १४७.९३ (२.८) | १७६.०० (३.८) | १७५.१७ (३.०) | ३३४.९३ (३.५) | २४९.५ (३.७) | ६५६.६६ (५.५) | १११७.१५ (७.२) | ७३६.८५ (४.३) | ४४५७.८९ (५.१) |
| ५ | विद्युत विकास | ४५०.०० (८.९) | ४१८.०० (७.४) | २४२.०० (४.६) | ३१८.६७ (६.८) | ३७४.२६ (६.४) | ४५८.०६ (४.८) | ३२८.४ (४.८) | ५८४.०० (४.९) | ३३३.४२ (२.१) | ७७७.०० (४.५) | ४२८३.८१ (४.९) |
| ६ | उद्योग व खनिजे | १.४० (०.०६) | १.४० (०.०२) | १.२५ (०.०२) | ०.७५ (०.०२) | ०.४० (०.००७) | ०.४० (०.००४) | ०.४० (०.०६) | १.०० (०.००८) | १.०० (०.००६) | १.०० (०.००६) | ९.०० (०.०१) |
| ७ | वाहतुक व दळणवळण | ४४१.०५ (८.७) | ४५६.८८ (८.१) | ३४०.४४ (६.६) | ३१८.९४ (६.८) | १७४.०९ (३.०) | ६३७.३२ (६.६) | ९५३.८१ (१४.१) | १०६२.१८ (८.९) | १५५२.१६ (९.९) | १७७४.९७ (१०.३) | ७७११.८४ (८.८) |
| ८ | सामान्य आर्थिक सेवा | १.०० (०.०४) | ३२५.२० (५.७) | ३८०.०० (७.३) | ८.०० (०.०२) | ०.१० (०.००२) | १.०० (०.०१) | ०.०० (०.०) | १५.२३ (०.०१) | ११.२९ (०.०७) | ३४.७४ (०.०२) | ७७६.५६ (०.०९) |
| ९ | सामाजिक व सामूहीक सेवा | २६००.८१ (५१.३) | २५५४.११ (४५.२) | २७०१.१५ (५१.८) | २४९२.३२ (५३.२) | ३८७७.०९ (६६.७) | ८३२१.५२ (७१.१) | ३८८०.३१ (५७.४) | ७७५९.५२ (६४.९) | ०७२३.४२ (६८.७) | १५१८.१६ (६६.७) | ५४९३९.४१ (६२.७) |
| | एकूण | ५०६५.०० | ५६४७.१९ | ५२११.२३ | ४६८२.८३ | ५८१७.५६ | ६६०७.६७ | ६७६४.६३ | ११९५६.२१ | ५६०४.९९ | ७२६२.४२ | ८७६१९.७३ |
| | टक्केवारी | (५.८) | (६.५) | (५.९) | (५.४) | (६.६) | (११.०) | (७.७) | (१३.६) | (१७.८) | (१९.७) | (१००.००) |

संदर्भ - वार्षिक आदिवासी उपयोजना अहवाल २०००-०१ ते २००९-१० (टिप - त. ना. = तरतुद नाही)

## आलेख

## आदिवासी विकास योजनांवर झालेल्या वर्षनिहाय खर्चाचे वर्गीकरण



**सन २०००-२००१ या आर्थिक वर्षातील खर्च : -**

वरील कोष्टकावरुन असे दिसून येते की, सन २०००-२००१ मध्ये नाशिक जिल्ह्यातील आदिवासी विकास योजनांवर एकूण ५०६५०० लाख रुपये इतका खर्च केलेला असून यात कृषी व संलग्न सेवावर ४७४.५८ लाख रुपये इतका खर्च झालेला असून या योजनेवर झालेल्या खर्चाचे शेकडा प्रमाण ९.४ टक्के आहे. ग्रामीण विकासावर ६१४.४६ लाख रुपये खर्च केला असून त्याचे शेकडा प्रमाण १२.१ टक्के आहे. या वर्षी विशेष क्षेत्रिय कार्यक्रमावर कोणताही खर्च केलेला नाही. याच वर्षी पाटबंधारे व पुरनियंत्रण या योजनेवर ४८१.७० लाख रुपये खर्च करण्यात आला असून त्याचे शेकडा प्रमाण ९.५ टक्के आहे. विद्युत विकासावर ४५०.०० लाख रुपये खर्च करण्यात आला असून त्यांचे शेकडा प्रमाण ८.९ टक्के आहे. उद्योग व खनिजे या योजनेवर १.४० लाख रुपये खर्च झालेला असून त्यांचे शेकडा प्रमाण ०.०६ टक्के आहे. वाहतुक व दळणवळण या शिर्षावर ४४१.०५ लाख रुपये खर्च झालेला असून त्यांचे शेकडा प्रमाण ८.७ टक्के आहे. सामान्य आर्थिक सेवावर १.०० लाख रुपये खर्च केलेला असून त्यांचे शेकडा प्रमाण ०.०४ टक्के आहे. सामाजिक व सामूहिक सेवांवर २६००.८१ लाख रुपये खर्च करण्यात आलेला असून त्यांचे शेकडा प्रमाण ५१.३ टक्के आहे. म्हणजेच सन २०००-०१ या आर्थिक वर्षात सामाजिक व सामूहिक सेवांवर केलेल्या खर्चाचे प्रमाण सर्वाधिक आहे.

**सन २००१-२००२ या आर्थिक वर्षातील खर्च : -**

वरील कोष्टकावरुन असे दिसून येते की, सन २००१-२००२ मध्ये नाशिक जिल्ह्यातील आदिवासी विकास योजनांवर एकूण ५६४७.१९ लाख रुपये इतका खर्च केलेला असून यात कृषी व संलग्न सेवावर ५०५.४२ लाख रुपये इतका खर्च झालेला असून त्याचे शेकडा प्रमाण ८.९ टक्के आहे. ग्रामीण विकासावर ८५०.७८ लाख रुपये खर्च केला असून त्याचे शेकडा प्रमाण १५.१ टक्के आहे. विशेष क्षेत्रिय कार्यक्रमावर १५३.४० लाख रुपये खर्च करण्यात आला असून त्याचे शेकडा प्रमाण २.७ टक्के आहे. पाटबंधारे व पुरनियंत्रण या योजनेवर ३८२.०० लाख रुपये खर्च करण्यात आला असून त्याचे शेकडा प्रमाण ६.७ टक्के आहे. विद्युत विकास योजनेवर ४१८.०० लाख रुपये खर्च करण्यात आला असून त्यांचे शेकडा प्रमाण ७.४ टक्के आहे. उद्योग व खनिजे या शीर्षावर १.४० लाख रुपये खर्च झालेला असून त्यांचे शेकडा प्रमाण ०.०२ टक्के आहे. वाहतुक व दळणवळण या शीर्षावर ४५६.८८ लाख रुपये खर्च झालेला असून त्यांचे शेकडा प्रमाण ८.१ टक्के आहे. सामान्य आर्थिक सेवावर ३२५.२० लाख रुपये खर्च केलेला असून त्यांचे शेकडा प्रमाण ५.७ टक्के आहे. सामाजिक व सामूहिक सेवांवर २५५४.११ लाख रुपये खर्च करण्यात आलेला असून त्यांचे शेकडा प्रमाण ४५.२ टक्के आहे. म्हणजेच सन २००१-०२ या आर्थिक वर्षात सामाजिक व सामूहिक सेवांवर केलेल्या खर्चाचे प्रमाण सर्वाधिक आहे.

**सन २००२-२००३ या आर्थिक वर्षातील खर्च : -**

वरील कोष्टकावरुन असे दिसून येते की, सन २००२-२००३ मध्ये नाशिक जिल्ह्यातील आदिवासी विकास योजनांवर एकूण ५२११.२३ लाख रुपये इतका खर्च केलेला असून यात कृषी व संलग्न सेवावर ३४१.८५ लाख रुपये इतका खर्च झालेला असून त्याचे शेकडा प्रमाण ६.६ टक्के आहे. ग्रामीण विकासावर ९०३.२१ लाख रुपये खर्च केला असून त्याचे शेकडा प्रमाण १७.३ टक्के आहे. विशेष क्षेत्रिय कार्यक्रम किंवा डोंगरी क्षेत्र विकास कार्यक्रमावर १५३.४० लाख रुपये खर्च करण्यात आला असून त्याचे शेकडा प्रमाण २.९ टक्के आहे. पाटबंधारे व पुरनियंत्रण या योजनेवर १४७.९३ लाख रुपये खर्च करण्यात आला असून त्याचे शेकडा प्रमाण२.८ टक्के आहे. विद्युत विकास योजनेवर २४२.०० लाख रुपये खर्च करण्यात आला असून त्यांचे शेकडा प्रमाण ४.६ टक्के आहे. उद्योग व खनिजे या शीर्षावर १२.५ लाख रुपये खर्च झालेला असून त्यांचे शेकडा प्रमाण ०.०२ टक्के आहे. वाहतुक व दळणवळण या शीर्षावर ३४०.४४ लाख रुपये खर्च झालेला असून त्यांचे शेकडा प्रमाण ६.६ टक्के आहे. सामान्य आर्थिक सेवावर ३८०.०० लाख रुपये खर्च केलेला असून त्यांचे शेकडा प्रमाण ७.३ टक्के आहे. सामाजिक व सामूहिक सेवांवर २७०१.१५ लाख रुपये खर्च करण्यात आलेला असून त्यांचे शेकडा प्रमाण ५१.८ टक्के आहे. म्हणजेच सन २००२-०३ या आर्थिक वर्षात सामाजिक व सामूहिक सेवांवर केलेल्या खर्चाचे प्रमाण सर्वाधिक आहे.

**सन २००३-२००४ या आर्थिक वर्षातील खर्च :-**

वरील कोष्टकावरुन असे दिसून येते की, सन २००३-२००४ मध्ये नाशिक जिल्ह्यातील आदिवासी विकास योजनांवर एकूण ४६८२.८३ लाख रुपये इतका खर्च केलेला असून यात कृषी व संलग्न सेवावर २९६.४३ लाख रुपये इतका खर्च झालेला असून त्याचे शेकडा प्रमाण ६.३ टक्के आहे. ग्रामीण विकासावर १०७१.७२ लाख रुपये खर्च केला असून त्याचे शेकडा प्रमाण २२.९ टक्के आहे. विशेष क्षेत्रिय कार्यक्रम / डोंगरी क्षेत्र विकास कार्यक्रमावर कोणताही खर्च करण्यात आलेला नाही. पाटबंधारे व पुरनियंत्रण या योजनेवर १७६.०० लाख रुपये खर्च करण्यात आला असून त्याचे शेकडा प्रमाण ३.८ टक्के आहे. विद्युत विकास योजनेवर ३१८.६७ लाख रुपये खर्च करण्यात आला असून त्यांचे शेकडा प्रमाण ६.८ टक्के आहे. उद्योग व खनिजे या शीर्षावर ०.७५ लाख रुपये खर्च झालेला असून त्यांचे शेकडा प्रमाण ०.०२ टक्के आहे. वाहतुक व दळणवळण या शीर्षावर ३१८.९४लाख रुपये खर्च झालेला असून त्यांचे शेकडा प्रमाण ६.८ टक्के आहे. सामान्य आर्थिक सेवावर ८.०० लाख रुपये खर्च केलेला असून त्यांचे शेकडा प्रमाण ०.०२ टक्के आहे. सामाजिक व सामूहिक सेवांवर २४९२.३२ लाख रुपये खर्च करण्यात आलेला असून त्यांचे शेकडा प्रमाण ५३.२ टक्के आहे. म्हणजेच सन २००३-०४ या आर्थिक वर्षात सामाजिक व सामूहिक सेवांवर केलेल्या खर्चाचे प्रमाण सर्वाधिक आहे.

**सन २००४-२००५ या आर्थिक वर्षातील खर्च : -**

वरील कोष्टकावरुन असे दिसून येते की, सन २००४-२००५ मध्ये नाशिक जिल्ह्यातील आदिवासी विकास योजनांवर एकूण ५८१७.५६ लाख रुपये इतका खर्च केलेला असून यात कृषी व संलग्न सेवावर १५६.८५ लाख रुपये इतका खर्च झालेला असून त्याचे शेकडा प्रमाण २.७ टक्के आहे. ग्रामीण विकासावर १०५९.६० लाख रुपये खर्च केला असून त्याचे शेकडा प्रमाण १८.२ टक्के आहे. विशेष क्षेत्रिय कार्यक्रम किंवा डोंगरी क्षेत्र विकास कार्यक्रमावर या आर्थिक वर्षात कोणतीही तरतूद केलेली नाही. पाटबंधारे व पुरनियंत्रण या योजनेवर १७५.१७ लाख रुपये खर्च करण्यात आला असून त्याचे शेकडा प्रमाण ३.० टक्के आहे. विद्युत विकास योजनेवर ३७४.२६ लाख रुपये खर्च करण्यात आला असून त्यांचे शेकडा प्रमाण ६.४ टक्के आहे. उद्योग व खनिजे या शीर्षावर ०.४० लाख रुपये खर्च झ‍ालेला असून त्यांचे शेकडा प्रमाण ०.००७ टक्के आहे. वाहतुक व दळणवळण या शीर्षावर १७४.०९ लाख रुपये खर्च झालेला असून त्यांचे शेकडा प्रमाण ३.० टक्के आहे. सामान्य आर्थिक सेवावर ०.१० लाख रुपये खर्च केलेला असून त्यांचे शेकडा प्रमाण ०.००२ टक्के आहे. सामाजिक व सामूहिक सेवांवर ३८७७.०९ लाख रुपये खर्च करण्यात आलेला असून त्यांचे शेकडा प्रमाण ६६.७ टक्के आहे. म्हणजेच सन २००४-०५ या आर्थिक वर्षात सामाजिक व सामूहिक सेवांवर केलेल्या खर्चाचे प्रमाण सर्वाधिक आहे.

**सन २००५-२००६ या आर्थिक वर्षातील खर्च : -**

वरील कोष्टकावरुन असे दिसून येते की, सन २००५-२००६ मध्ये नाशिक जिल्ह्यातील आदिवासी विकास योजनांवर एकूण ९६०७.६७ लाख रुपये इतका खर्च केलेला असून यात कृषी व संलग्न सेवावर २५२.०८ लाख रुपये इतका खर्च झालेला असून त्याचे शेकडा प्रमाण २.६ टक्के आहे. ग्रामीण विकासावर १०९१.३६ लाख रुपये खर्च केला असून त्याचे शेकडा प्रमाण ११.४ टक्के आहे. विशेष क्षेत्रिय कार्यक्रम किंवा डोंगरी क्षेत्र विकास कार्यक्रमावर या आर्थिक वर्षात कोणतीही तरतूद केलेली नाही. पाटबंधारे व पुरनियंत्रण या योजनेवर ३३४.९३ लाख रुपये खर्च करण्यात आला असून त्याचे शेकडा प्रमाण ३.५ टक्के आहे. विद्युत विकास योजनेवर ४५८.०६ लाख रुपये खर्च करण्यात आला असून त्यांचे शेकडा प्रमाण ४.८ टक्के आहे. उद्योग व खनिजे या शीर्षावर ०.४० लाख रुपये खर्च झालेला असून त्यांचे शेकडा प्रमाण ०.००४ टक्के आहे. वाहतुक व दळणवळण या शीर्षावर ६३७.३२ लाख रुपये खर्च झालेला असून त्यांचे शेकडा प्रमाण ६.६ टक्के आहे. सामान्य आर्थिक सेवावर १.०० लाख रुपये खर्च केलेला असून त्यांचे शेकडा प्रमाण ०.०१ टक्के आहे. सामाजिक व सामूहिक सेवांवर ६८३२.५२ लाख रुपये खर्च करण्यात आलेला असून त्यांचे शेकडा प्रमाण ७१.१ टक्के आहे. म्हणजेच सन २००५-०६ या आर्थिक वर्षात सामाजिक व सामूहिक सेवांवर केलेल्या खर्चाचे प्रमाण सर्वाधिक आहे.

**सन २००६-२००७ या आर्थिक वर्षातील खर्च : -**

वरील कोष्टकावरुन असे दिसून येते की, सन २००६-२००७ मध्ये नाशिक जिल्ह्यातील आदिवासी विकास योजनांवर एकूण ६७६४.६३ लाख रुपये इतका खर्च केलेला असून यात कृषी व संलग्न सेवावर ३३९.५ लाख रुपये इतका खर्च झालेला असून त्याचे शेकडा प्रमाण ५.० टक्के आहे. ग्रामीण विकासावर १०१२.७१ लाख रुपये खर्च केला असून त्याचे शेकडा प्रमाण १५.० टक्के आहे. विशेष क्षेत्रिय कार्यक्रम किंवा डोंगरी क्षेत्र विकास कार्यक्रमावर या आर्थिक वर्षात कोणतीही तरतूद केलेली नाही. पाटबंधारे व पुरनियंत्रण या योजनेवर २४९.५ लाख रुपये खर्च करण्यात आला असून त्याचे शेकडा प्रमाण ३.७ टक्के आहे. विद्युत विकास योजनेवर ३२८.४ लाख रुपये खर्च करण्यात आला असून त्यांचे शेकडा प्रमाण ४.८ टक्के आहे. उद्योग व खनिजे या शीर्षावर ०.४० लाख रुपये खर्च झालेला असून त्यांचे शेकडा प्रमाण ०.००६ टक्के आहे. वाहतुक व दळणवळण या शीर्षावर ९५३.८१ लाख रुपये खर्च झालेला असून त्यांचे शेकडा प्रमाण १४.१ टक्के आहे. सामान्य आर्थिक सेवावर या आर्थिक वर्षात कोणतीही तरतुद केलेली नाही. सामाजिक व सामूहिक सेवांवर ३८८०.३१ लाख रुपये खर्च करण्यात आलेला असून त्यांचे शेकडा प्रमाण ५७.४ टक्के आहे. म्हणजेच सन २००६-०७ या आर्थिक वर्षात सामाजिक व सामूहिक सेवांवर केलेल्या खर्चाचे प्रमाण सर्वाधिक आहे.

**सन २००७-२००८ या आर्थिक वर्षातील खर्च : -**

वरील कोष्टकावरुन असे दिसून येते की, सन २००७-२००८ मध्ये नाशिक जिल्ह्यातील आदिवासी विकास योजनांवर एकूण ११९५६.२१ लाख रुपये इतका खर्च केलेला असून यात कृषी व संलग्न सेवावर ५४३.१९ लाख रुपये इतका खर्च झालेला असून त्याचे शेकडा प्रमाण ४.५ टक्के आहे. ग्रामीण विकासावर १३३४.४३ लाख रुपये खर्च केला असून त्याचे शेकडा प्रमाण ११.२ टक्के आहे. विशेष क्षेत्रिय कार्यक्रम किंवा डोंगरी क्षेत्र विकास कार्यक्रमावर या आर्थिक वर्षात कोणतीही तरतूद केलेली नाही. पाटबंधारे व पुरनियंत्रण या योजनेवर ६५६.६६ लाख रुपये खर्च करण्यात आला असून त्याचे शेकडा प्रमाण ५.५ टक्के आहे. विद्युत विकास योजनेवर ५८४.० लाख रुपये खर्च करण्यात आला असून त्यांचे शेकडा प्रमाण ४.९ टक्के आहे. उद्योग व खनिजे या शीर्षावर १.०० लाख रुपये खर्च झ- ालेला असून त्यांचे शेकडा प्रमाण ०.००८ टक्के आहे. वाहतुक व दळणवळण या शीर्षावर १०६२.१८ लाख रुपये खर्च झालेला असून त्यांचे शेकडा प्रमाण ८.९ टक्के आहे. सामान्य आर्थिक सेवावर १५.२३ लाख रुपये खर्च केलेला असून त्यांचे शेकडा प्रमाण ०.०१ टक्के आहे. सामाजिक व सामूहिक सेवांवर ७७५९.५२ लाख रुपये खर्च करण्यात आलेला असून त्यांचे शेकडा प्रमाण ६४.९ टक्के आहे. म्हणजेच सन २००७-०८ या आर्थिक वर्षात सामाजिक व सामूहिक सेवांवर केलेल्या खर्चाचे प्रमाण सर्वाधिक आहे.

**सन २००८-२००९ या आर्थिक वर्षातील खर्च : -**

वरील कोष्टकावरुन असे दिसून येते की, सन २००८-२००९ मध्ये नाशिक जिल्ह्यातील आदिवासी विकास योजनांवर एकूण १५६०४.९९ लाख रुपये इतका खर्च केलेला असून यात कृषी व संलग्न सेवावर ६५४.४८ लाख रुपये इतका खर्च झालेला असून त्याचे शेकडा प्रमाण ४.२ टक्के आहे. ग्रामीण विकासावर १२१२.०७ लाख रुपये खर्च केला असून त्याचे शेकडा प्रमाण ७.८ टक्के आहे. विशेष क्षेत्रिय कार्यक्रम किंवा डोंगरी क्षेत्र विकास कार्यक्रमावर या आर्थिक वर्षात कोणतीही तरतूद केलेली नाही. पाटबंधारे व पुरनियंत्रण या योजनेवर ११३७.१५ लाख रुपये खर्च करण्यात आला असून त्याचे शेकडा प्रमाण ७.२ टक्के आहे. विद्युत विकास योजनेवर ३३३.४२ लाख रुपये खर्च करण्यात आला असून त्यांचे शेकडा प्रमाण २.१ टक्के आहे. उद्योग व खनिजे या शीर्षावर १.०० लाख रुपये खर्च झालेला असून त्यांचे शेकडा प्रमाण ०.००६ टक्के आहे. वाहतुक व दळणवळण या शीर्षावर १५५२.१६ लाख रुपये खर्च झालेला असून त्यांचे शेकडा प्रमाण ९.९ टक्के आहे. सामान्य आर्थिक सेवावर ११.२९ लाख रुपये खर्च केलेला असून त्यांचे शेकडा प्रमाण ०.०७ टक्के आहे. सामाजिक व सामूहिक सेवांवर १०७२३.४२ लाख रुपये खर्च करण्यात आलेला असून त्यांचे शेकडा प्रमाण ६८.७ टक्के आहे. म्हणजेच सन २००९-१० या आर्थिक वर्षात सामाजिक व सामूहिक सेवांवर केलेल्या खर्चाचे प्रमाण सर्वाधिक आहे.

**सन २००९-२०१० या आर्थिक वर्षातील खर्च : -**

वरील कोष्टकावरुन असे दिसून येते की, सन २००९-२०१० मध्ये नाशिक जिल्ह्यातील आदिवासी विकास योजनांवर एकूण १७२६२.४२ लाख रुपये इतका खर्च केलेला असून यात कृषी व संलग्न सेवावर ९६४.८० लाख रुपये इतका खर्च झालेला असून त्याचे शेकडा प्रमाण ५.६ टक्के आहे. ग्रामीण विकासावर १४५४.९० लाख रुपये खर्च केला असून त्याचे शेकडा प्रमाण ८.४ टक्के आहे. विशेष क्षेत्रिय कार्यक्रम किंवा डोंगरी क्षेत्र विकास कार्यक्रमावर या आर्थिक वर्षात कोणतीही तरतूद केलेली नाही. पाटबंधारे व पुरनियंत्रण या योजनेवर ७३६.८५ लाख रुपये खर्च करण्यात आला असून त्याचे शेकडा प्रमाण ४.३ टक्के आहे. विद्युत विकास योजनेवर ७७७.०० लाख रुपये खर्च करण्यात आला असून त्यांचे शेकडा प्रमाण ४.५ टक्के आहे. उद्योग व खनिजे या शीर्षावर १.०० लाख रुपये खर्च झालेला असून त्यांचे शेकडा प्रमाण ०.००६ टक्के आहे. वाहतुक व दळणवळण या शीर्षावर १७७४.९७ लाख रुपये खर्च झालेला असून त्यांचे शेकडा प्रमाण १०.३ टक्के आहे. सामान्य आर्थिक सेवावर ३४.७४ लाख रुपये खर्च केलेला असून त्यांचे शेकडा प्रमाण ०.०२ टक्के आहे. सामाजिक व सामूहिक सेवांवर ११५१८.१६ लाख रुपये खर्च करण्यात आलेला असून त्यांचे शेकडा प्रमाण ६६.७ टक्के आहे. म्हणजेच सन २००९-१० या आर्थिक वर्षात सामाजिक व सामूहिक सेवांवर केलेल्या खर्चाचे प्रमाण सर्वाधिक आहे.

**निष्कर्ष : -**

१) नाशिक जिल्ह्यात सन २०००-०१ ते २००९-१० या दहा वर्षात आदिवासी उपयोजने अंतर्गत विविध विकास शीर्षावर एकूण रु. ८७६१९.७३ लाख खर्च झालेले असून यात सामाजिक व सामूहिक सेवा योजनेवर सर्वात जास्त रु. ५४९३९.४१ लाख (६२.७ टक्के) खर्च झालेला आहे. तर उद्योग व खनिजे या योजनेवर सर्वात कमी रु. ९.०० लाख (०.०१ टक्के) खर्च झालेला आहे.

२) नाशिक जिल्ह्यात कृषी व संलग्न सेवावर २०००-०१ या आर्थिक वर्षात केलेल्या खर्चाचे प्रमाण सर्वात जास्त रु. ४७४.५८ लाख (९.४ टक्के) आहे. तर २००५-०६ या आर्थिक वर्षात केलेल्या खर्चाचे प्रमाण सर्वात कमी रु. २५२.०८ लाख (२.६ टक्के) आहे.

३) नाशिक जिल्ह्यात ग्रामीण विकास योजनेवर २००३-०४ या आर्थिक वर्षात केलेल्या खर्चाचे प्रमाण सर्वात जास्त रु. १०७१.७२ लाख (२२.९ टक्के) आहे. तर २००८-०९ या आर्थिक वर्षात केलेल्या खर्चाचे प्रमाण सर्वात कमी (७.८ टक्के) आहे.

४) नाशिक जिल्ह्यात विशेष क्षेत्रीय कार्यक्रमावर सन २००१-०२ व सन २००२-०३ या दोन आर्थिक वर्षाचा अपवाद वगळता इतर आर्थिक वर्षात कोणत्याही प्रकारची आर्थिक तरतुद करण्यात आलेली नाही.

५) नाशिक जिल्ह्यात पाटबंधारे व पूरनियंत्रण योजनेवर सन २०००-०१ या आर्थिक वर्षात केलेल्या खर्चाचे प्रमाण सर्वात जास्त रु. ४८१.७० लाख (९.५ टक्के) तर २००२-०३ या आर्थिक वर्षात केलेल्या खर्चाचे प्रमाण सर्वात कमी रु. १४७.९३ लाख (२.८ टक्के) आहे.

६) नाशिक जिल्ह्यात विद्युत विकास योजनेवर सन २०००-०१ या आर्थिक वर्षात केलेल्या खर्चाचे प्रमाण सर्वात जास्त रु. ४५०.०० लाख (८.९ टक्के) तर २००८-०९ या आर्थिक वर्षात केलेल्या खर्चाचे प्रमाण सर्वात कमी ३३३.४२ लाख रु. (२.१ टक्के) आहे.

७) नाशिक जिल्ह्यात उद्योग व खनिजे योजनेवर सन २००१-०२ या आर्थिक वर्षात केलेल्या खर्चाचे प्रमाण सर्वात जास्त रु. १.४० लाख (०.०२ टक्के) तर २००५-०६ या आर्थिक वर्षात केलेल्या खर्चाचे प्रमाण सर्वात कमी ०.४० लाख रु. (०.००४ टक्के) आहे.

८) नाशिक जिल्ह्यात वाहतुक व दळणवळण योजनेवर सन २००६-०७ या आर्थिक वर्षात केलेल्या खर्चाचे प्रमाण सर्वात जास्त रु. ९५३.८१ लाख (१४.१ टक्के) तर २००४-०५ या आर्थिक वर्षात केलेल्या खर्चाचे प्रमाण सर्वात कमी १७४.०९ लाख रु. (३.० टक्के) आहे.

९) नाशिक जिल्ह्यात सामान्य आर्थिक सेवा योजनेवर सन २००२-०३ या आर्थिक वर्षात केलेल्या खर्चाचे प्रमाण सर्वात जास्त रु. ३८०.०० लाख (७.३ टक्के) तर २००४-०५ या आर्थिक वर्षात केलेल्या खर्चाचे प्रमाण सर्वात कमी ०.१० लाख रु. (०.००२ टक्के) आहे.

१०) नाशिक जिल्ह्यात सामाजिक व सामूहिक सेवा योजनेवर सन २००५-०६ या आर्थिक वर्षात केलेल्या खर्चाचे प्रमाण सर्वात जास्त रु. ६८३२१.५२ लाख (७१.१ टक्के) तर २००१-०२ या आर्थिक वर्षात केलेल्या खर्चाचे प्रमाण सर्वात कमी २५५४.११ लाख रु. (४५.२ टक्के) आहे.

**संदर्भ : -**

१. वार्षिक आदिवासी उपयोजना अहवाल (२०००-०१ ते २००९-१०) महाराष्ट्र शासन, आदिवासी विकास योजना.

२. कार्यक्रम अंदाजपत्रक (२००८-०९) आदिवासी विकास विभाग मध्यवर्ती कारागृह, मुद्रणालय, नागपूर.

३. जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन (२०१०-११)

**संकेतस्थळ : -**

1. www.nashik.nic.in
2. www.mahatribal.com